# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २२ मार्च, २०१७ / चैत्र १, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) गृहनिर्माण मंत्री**<br>**(३) कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५३**

---

**ठाणे महानगरपालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेणेबाबत**

**(१) * २७१६७ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा अधिकार असतानासुध्दा महानगरपालिका प्रशासनाने शासनाकडे मार्गदर्शन मागितले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेमध्ये यापूर्वीही ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यात आले आहे, त्यांच्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागितले नसताना, आता संबंधित उर्वरित कर्मचाऱ्यांबाबत मार्गदर्शन घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कंत्राटी पध्दतीवरील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे व त्याबाबतची सद्‌य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये कंत्राटी पध्दतीने सहा महिन्यापेक्षा कमी कालावधीकरीता नेमणूका करण्याचे अधिकार ठाणे महानगरपालिका यांना आहेत.

कलम ५१ (४) नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नवीन पद निर्मिती करण्याचे अधिकार शासनास निहित आहेत.

पीसे-टेमघर येथील २१० द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेवरील कार्यरत कंत्राटी कामगारांना ठाणे महानगरपालिकेच्या नियमित सेवेत सामावुन घेता येईल किंवा कसे याबाबत ठाणे महानगरपालिकेने दिनांक २२/०९/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे दिशा निर्देश देण्याची विनंती केली आहे.

तसेच दिनांक २८/०९/२०१६ च्या पत्रान्वये अस्थायी पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना लिपीक संवर्गात सामावुन घेण्याकरीता मार्गदर्शन मिळण्याची विनंती केली आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर त्यांनी केलेल्या विनंतीनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (४) नुसार नगरविकास विभागाने यापूर्वी दिनांक ३१/०१/२०००, दिनांक १८/०२/२००३ व दिनांक २३/०७/२००३ च्या शासन निणयान्वये एकूण १३१६ पदांना मंजुरी दिली होती.

या मंजुर पदांवर सेवा प्रवेश नियम, सेवा जेष्ठता व वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले शासन आदेशांच्या अनुषंगाने निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना यापूर्वी ठाणे महानगरपालिकेत नियुक्ती देण्यात आली आहे.

या प्रक्रियेद्वारे निवड न झालेल्या अस्थायी/कंत्राटी कर्मचाऱ्यांनी लोक प्रतिनिधीमार्फत वारंवार विनंती केल्यामुळे ठाणे महानगरपालिकेने माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये शासनाशी पत्र व्यवहार केला आहे.

(३) कर्नाटक राज्य विरुध्द उमादेवी प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २००६ मध्ये दिलेल्या न्याय निर्णयानुसार मंजुर पदांवर केवळ विहित मार्गाने नियुक्ती करण्याबाबत शासनाचे धोरण आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शासनाने महानगरपालिकेच्या मागणीनुसार आवश्यक ती पद निर्मिती केलेली आहे. त्यानुसार रिक्त पदांवर विहित प्रक्रियेचे अनुपालन करुन ठाणे महानगरपालिकने पद भरती करावयाची आहे.

-----------------

**पुणे महानगरपालिकेने महत्वाचे प्रकल्प राबविताना खाजगी सल्लागार व तज्ञ व्यक्तींची नेमणूक केल्याबाबत**

**(२) * २७१४४ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका प्रत्येक प्रकल्प उभारताना प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी सल्लागार कंपनीची नेमणूक करीत असताना दुसऱ्या बाजूला या प्रकल्पाचे काम सुरु झाल्यानंतर त्यावर लक्ष ठेवण्यासाठी नव्याने तज्ज्ञ व्यक्तिंची नेमणूक करीत असून त्यावर लाखो रुपये खर्च करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पावर सल्लागार व तज्ज्ञ व्यक्तिंची नेमणूक करून त्यांच्यावर लाखो रुपये खर्च करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत. तसेच अनावश्यक खर्च रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पुणे महानगरपालिकेतर्फे महत्वाचे प्रकल्प राबविताना मोठया प्रकल्पाचे संकल्पचित्र, डिझाईन व विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी स्वतंत्र कक्ष नसल्याने त्यासाठी संबंधीत क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यात येते.

जर नेमणूक केलेली संस्था अंमलबजावणीच्या वेळी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करणेस तयार असेल व त्यांच्याकडे तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता होत असेल तर त्याच सल्लागाराची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात येते.

तथापि, विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणाऱ्या सल्लागाराने प्रकल्प व्यवस्थापनाचे काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास अन्य तज्ञ सल्लागाराची स्वतंत्र नेमणूक करण्यात येते.

या प्रकल्पांच्या कार्यपूर्ततेच्या टप्प्यानुसार प्रकल्प फी तज्ञ सल्लागारास अदा करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, बहुतांशी प्रकल्पात एकाच तज्ञ सल्लागाराची नेमणूक पुणे महानगरपालिकेकडून करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती येथे शेतकरी मोर्चावर पोलिसांनी केलेला लाठीहल्ला**

**(३) * २७६७८ श्री.रामराव वडकुते, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे नोटबंदीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजार मदत व इतर काही मागण्यांबाबत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेल्या शेतकरी मोर्चावर पोलिसांनी लाठीहल्ला केल्याची घटना दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार शेतकरी मोर्चावर लाठीहल्ला करणाऱ्या पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक ०५/०१/२०१७ रोजी प्रहार संघटनेच्यावतीने नांगर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, परंतू, दिनांक ०४/०१/२०१७ रोजी सायंकाळी विधानपरिषद पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता लागल्याने विभागीय आयुक्त, अमरावती व जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या आदेशान्वये मोर्चा आयोजकांना मोर्चास दिलेली परवानगी आचारसंहितेमुळे रद्द करण्यात आल्याचे लेखी कळविण्यात आले होते. तरीसुद्धा प्रशासकीय आदेश झुगारुन मोर्चा काढण्यात आला. सदर मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आला असता त्यांना रोखण्यासाठी लावलेल्या लोखंडी बॅरीकेट्स मोर्चेक-यांनी ट्रॅक्टरच्या सहाय्याने तोडण्याचा प्रयत्न केला. तसेच, जमावातील मोर्चेक-यांनी बॅरीकेट्स तोडून पोलिसांना धक्काबुक्की व दगडफेक केली त्यात ७ पोलीस अधिकारी व ८ पोलीस कर्मचारी जखमी झाले. सदर ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याने मोर्चेक-यांना रोखण्यासाठी पोलिसांनी

प्रथम “वरुण” या वाहनाने जमावावर पाण्याचा मारा केला, तसेच दंगा नियंत्रण पथकातील कर्मचा-यांकडून ४ गॅस हवेत उडविण्यात आले व ४ हॅन्डग्रेनेड जमावाच्या दिशेने फेकण्यात आले. परंतू, जमाव ऐकण्याच्या स्थितीत नव्हता व पोलिसांवर तिव्रतेने हल्ला करीत होता. कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी सौम्य लाठीचार्ज करण्यात आला. पोलिसांवर हल्ला करणे व सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केल्याबाबत मोर्चेक-यांविरुद्ध गाडगेनगर पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. १६/२०१७ भादंवी कलम १४३, १४७, १४८, १४९, ३०७, ३३२, ३३३, ३३६, १८८ सह कलम १३५, १३६ मपोका, ३, ४ सार्वजनिक संपत्ती नुकसान कायदा ७ क्री. लॉ. अमेन्डमेंट ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई व पुणे येथील गुंतवणूकदारांची टेम्पल रोज रिअल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने फसवणूक केल्याबाबत

**(४)** * **२८०६४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेम्पल रोज रिअल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने पैसे दुप्पट करण्याच्या फसव्या योजना दाखवून मुंबई-पुण्यातील हजारो गुंतवणूकदारांकडून अंदाजे चारशे कोटी रुपये जमा करुन गुंतवणूकदारांना फसविल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने उक्त कंपनीच्या संचालकांविरुध्द कारवाई करुन त्यांची मालमत्ता जप्त करुन गुंतवणूकदारांचे पैसे परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी रोज रिअल इस्टेट प्रायव्हेट कंपनीच्या ५ संचालकाविरोधात आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र.०८/१७ कलम ४०९, ४२०, १२० (ब) भा.दं.वि. सह कलम ३ व ४ एमपीआयडी ॲक्ट १९९९ व कलम ४, ५ व ६ पीसीएमसीबी ॲक्ट १९७८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरहू प्रकरण तपासाधीन असून कंपनीच्या संचालकांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही एम.पी.आय.डी. कायद्यान्वये चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लातूर येथील किर्ती ऑईल मिलच्या टँकमध्ये कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(५) * २९४३० श्री.जयंत पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर येथील किर्ती ऑईल मिलमध्ये दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास टँकची स्वच्छता करण्यासाठी उतरलेल्या ७ कामगारांचा स्वच्छतेसाठी टाकलेल्या रसायनाच्या वासाने अत्यवस्थ होऊन मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी उक्त कारखान्याच्या व्यवस्थापन मंडळावर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
किर्ती ॲग्रोवेट लि., या कारखान्यातील ई.टी.पी. विभागातील एरिअेशन टाकीमधील स्लज (गाळ) काढण्यासाठी उतरलेल्या ४ कामगारांना विषारी वायूची बाधा होऊन ते टाकीत पडले. त्यांना मदत करणेसाठी ५ कामगार टाकीमध्ये उतरले असता, त्यांनाही टाकीतील विषारी वायूची बाधा झाली. सदर घटनेत कंत्राटदाराचे ४ व कारखान्याचे ५ असे एकूण ९ कामगारांचा टाकीतच गुदमरुन मृत्यू झाला आहे.
(२) सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मराठवाडा विभागामार्फत त्वरीत भेट देऊन चौकशी करण्यात आलेली असून कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७-अ(२)(अ)(ब)(क), कलम २१ (१) (iv) (b),(c) तसेच महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ४(१) (c), नियम ७३-V, नियम ७६ (C), नियम ११४ च्या अनुसूची क्र. २१ मधील खंड क्र. ३ चा उपखंड ५, Maharashtra Factories (Safety Audit) rules २०१४ च्या नियम ३ (a) (b) व नियम ११५ (२) च्या भंगाबाबत एकूण ८ फौजदारी खटले मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, लातूर यांचे न्यायालयात दिनांक ४/३/२०१७ रोजी दाखल करण्यात आले आहेत. तसेच कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ४०(२) अन्वये भोगवटादारावर कारखाना बंदचे आदेश पारीत केले आहेत.

कारखान्याच्या व्यवस्थापनाने कारखान्यात सर्व प्रकारच्या कामासाठी कामगारांचा दि न्यु इंडीया इन्श्युरन्स कं. लि. यांचेमार्फत विमा उतरविलेला आहे. मृत कामगारांच्या वारसास कायदेशीर देय नुकसान भरपाई विमा योजनेंतर्गत मिळण्याबाबत मा.आयुक्त, नुकसान भरपाई, लातूर, यांना कळविण्यात आले आहे व कारखान्याच्या व्यवस्थापनास सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर घटनेत मृत कामगारांच्या कायदेशीर वारसास प्रत्येकी रुपये १०,००,०००/- (रुपये दहा लाख) सानुग्रह अनुदान दिलेले आहे.

पोलीस विभागाने कारखान्याचे भोगवटादार व इतर ३ व्यक्तींवर भारतीय दंड विधानाच्या कलम ३०४ (२) व ३४ अन्वये गुन्हा नोंदविला होता व त्या चारही आरोपींना अटक करण्यात आली होती.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-याने सदर कारखाना बंद केल्याचे आदेश पारीत केले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोखारा (जि.नागपूर) येथील तुली पब्लिक स्कूलमधील कर्मचारी आदिवासी विद्यार्थीनींचे लैगिंक शोषण करीत असल्याबाबत**

**(६) * ३०१७२ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोखारा (जि.नागपूर) येथील तुली पब्लिक स्कूलमध्ये गरीब आदिवासी विद्यार्थीनींसोबत अश्लील चाळे करून तेथील एक कर्मचारी त्यांचे शोषण करीत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून सदरहू गुन्हयाची नोंद कोराडी पोलीस ठाण्यात दिनांक ८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घटनेमुळे पालक व नागरिकात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आरोपी व शाळा प्रशासनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर अंतर्गत पोलीस स्टेशन कोराडी येथे अपराध क्रमांक ०२/२०१७ कलम ३५४(अ), २०२ भादंवि सह कलम ७, ८, ११, १२ पोक्सो अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनांक ७/१/२०१७ रोजी तपासात कलम ३(१)(डब्ल्यू)(१)(२), ३(२)(अ) अनुसूचित जाती जमाती अत्याचार कायदा वाढ करण्यात आले आहे. गुन्हयातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

--------------------

**बोरीवली-कांदिवली भागातील राखीव भूखंडाचा अनधिकृतपणे ताबा घेतल्याबाबत**

**(७) * २६९९२ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली-कांदिवली भागातील ३ राखीव भूखंडाचा अनधिकृतपणे ताबा घेतल्याबद्दल एका लोकप्रतिनिधीला बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान त्यानुसार नोटीस बजावली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लोकप्रतिनिधीकडून अशा बऱ्याच मोकळया भूखंडावर ताबा मिळवून त्याच्या व्यावसायिक वापर केल्याच्याही तक्रारी लोकायुक्त यांचेकडे करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भूखंडाचा ताबा ज्या संस्थाकडून घेण्यात आला १) आदि गणेश चॅरिटेबल ट्रस्ट, २) युवक मंडळ, ३) किर्ती महिला उत्क्रांती मंडळ या संस्थाचे पदाधिकारी कोण आहेत, ज्यांनी हे भूखंड अनधिकृतपणे ताब्यात घेतले आहेत,
(४) असल्यास, या भूखंडावर म्हाडा किंवा महानगरपालिकेची कोणतेही परवानगी न घेता बांधकाम करण्यात आले असून उक्त भुखंडावर अनधिकृत अतिक्रमण करणाऱ्या संस्थाविरुध्द तसेच या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) महानगरपालिकेच्या भूखंडांवर म्हाडामार्फत निर्माण करण्यात आलेल्या सुविधा ज्या संस्थांना देण्यात येतात त्यांच्याकडून या मालमत्तांचा व्यावसायिक वापर करुन नागरिकांची लुबाडणूक करण्यात येत असल्याबाबत मा. लोक आयुक्त यांचेकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या हे खरे आहे.

याबाबत लोकप्रतिनिधींना नोटीस बजावण्यात आलेली नाही. तथापि, याबाबत संबंधित संस्थांना देण्यात आलेल्या नोटीसची प्रत म्हाडा प्राधिकरणास कार्यवाहीसाठी आणि लोकप्रतिनिधींना माहितीसाठी देण्यात आली आहे.

(३), (४) व (५) या भूखंडांशी संबंधित संस्थांचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत :-

**<u>अ. युवक मंडळ</u>**

- अध्यक्ष:- श्री. कृष्णा धोंडू बारे
- सचिव:- श्री. आर. एस. मौर्य
- खजिनदार:- श्री. माणिकराव बातुलवार

**<u>ब. आदि गणेश चॅरिटेबल ट्रस्ट</u>**

- अध्यक्ष:- श्री. जितेंद्र बजारिया
- सचिव:- श्री. रणजित वोरा
- खजिनदार:- श्री. शरद शेट्टये

**<u>क. किर्ती महिला उत्कर्ष मंडळ</u>**

- अध्यक्ष:- श्रीमती मनिषा बंड
- सचिव:- श्रीमती वैशाली जाधव
- खजिनदार:- श्री. शुक्ला बातुलवार

महानगरपालिकेच्या मालकीचे भूखंड व त्याची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे:-

**अ. <u>सी.टी.एस. ९१(भाग) ५३/९, ८९ए</u>**

- हा भूखंड खेळाचे मैदान म्हणून आरक्षित असून, युवक मंडळ या संस्थेस देखभालीकरिता दत्तक तत्त्वावर दिनांक २७/११/२००७ रोजी देण्यात आला होता. तद्नंतर सदर भूखंडाचा ताबा महानगरपालिकेस देण्यासाठी दिनांक २५/०१/२०१७ रोजी नोटीस बजावून दिनांक ०२/०३/२०१७ रोजी सदर भूखंडाचा एकतर्फी ताबा घेण्यात आला आहे.

- तथापि, सदर भूखंडावर म्हाडामार्फत जिल्हा नियोजन व विकास निधी अंतर्गत बांधण्यात आलेली व्यायामशाळा (हेल्थ क्लब हाऊस) अद्यापि युवक मंडळ या संस्थेच्या ताब्यात असून, त्याचा ताबा का घेण्यात येऊ नये याबाबत संबंधित संस्थेस दिनांक ०५/०१/२०१७ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे.

**ब. <u>सी.टी.एस. क्र. ४/१२</u>**

- हा भूखंड खेळाचे मैदान म्हणून आरक्षित असून, सदर भूखंड आदि गणेश चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेस देखभालीसाठी देण्यात आला होता. तथापि, याबाबत करारनामा करण्यात आलेला नाही. परंतु, सदर भूखंड अद्यापि आदि गणेश चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेच्या ताब्यात आहे.
- या भूखंडावर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन म्हाडामार्फत जिल्हा नियोजन विकास निधी अंतर्गत व्यायामशाळेचे बांधकाम करण्यात आले आहे.
- सदर बांधकाम आदि गणेश या संस्थेच्या ताब्यात असून, सदर बांधकामाचा ताबा का घेण्यात येऊ नये याबाबत सदर संस्थेस दिनांक ०५/०१/२०१७ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे.

**क. <u>सी.टी.एस. २६/ब</u>**

- सदर महानगरपालिकेच्या मालकीचा भूखंड विविध सुविधांकरिता (ॲमिनीटी स्पेस) आरक्षित आहे.
- या भूखंडावर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन म्हाडामार्फत जिल्हा नियोजन विकास निधी अंतर्गत समाजकल्याण केंद्राचे बांधकाम करण्यात आले असून सदर केंद्र म्हाडा प्राधिकरणामार्फत स्थानिक महिला बचत गटास देखभालीसाठी देण्यात आले आहे.
- सदर बांधकाम किर्ती महिला उत्कर्ष मंडळ या संस्थेच्या ताब्यात असून, सदर बांधकामाचा ताबा का घेण्यात येऊ नये याबाबत सदर संस्थेस दिनांक ०५/०१/२०१७ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे.

उपरोक्त संस्थांना देण्यात आलेल्या नोटीसबाबत उत्तर प्राप्त झाले असून, त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही सुरु असल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही.

-----------------

**भिवंडी (जि.ठाणे) शहरात बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने खरेदी केलेल्या सिमकार्डचा साठा हस्तगत केल्याबाबत**

**(८) * २९६९४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरात बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने आरोपींनी खरेदी केलेल्या सुमारे १५ हजार सिमकार्डचा साठा ठाणे गुन्हे शाखेने हस्तगत केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फेसबुकवरील ५० हजाराहून अधिक व्यक्तींचे फोटो डाऊनलोड करुन वेगळयाच व्यक्तींच्या बनावट नावाने कंपनीकडून सिमकार्ड खरेदी करुन तिस-याच व्यक्तीला ते विकत असल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन या सिमकार्डचा वापर इतर गुन्हे अथवा देशविघातक कारवायांमध्ये वापर करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदरहू प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील, परिमंडळ-२ क्षेत्रात भिवंडी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.२८७/२०१६ भा.दं.वि.स. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन एकुण ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयातील ५ आरोपींवर मा. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पहिले कोर्ट, भिवंडी येथे दोषारोपत्र पाठविण्यात आले आहे.

प्रस्तुतचे प्रकरण तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ऑनलाईन क्षेत्रातील ॲमेझॉन कंपनीने राष्ट्रध्वजाचा अवमान केल्याबाबत**

**(९) * २८६०५ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑनलाईन क्षेत्रातील ॲमेझॉन कंपनीने तिरंग्याचे पायपुसणे विक्रीला ठेवल्याचे तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे छायाचित्र असलेला चप्पल विक्रीला ठेवल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने सदरील घटनेची दखल घेऊन राज्यात ऑनलाईन विक्री करणा-या ॲमेझॉन कंपनीवर बंदी आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) या आशयाच्या वस्तु ॲमेझॉन, कॅनडा या संकेतस्थळावर विक्रीस असल्याची बाब निदर्शनास येताच मा.परराष्ट्र मंत्री, भारत सरकार यांनी संबंधीत कंपनीस या वस्तुंची विक्री करण्यास मज्जाव केला असुन, सदर कंपनीने या वस्तुंची विक्री थांबविली आहे.

तसेच यासंदर्भात ॲङ हफीजुद्दीन शदिउदीन काझी, रा.२५, शनिवार पेठ, पुणे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन लष्कर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५०/२०१७, भादंविक २९५(अ), ३४ भादंवि तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० क्र. ६७ अन्वये दिनांक ०८/०३/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये कर्मचारी/अधिकारी यांना प्रभारी पदभार व संवर्गबाहय नियुक्त्या देण्यात आल्याबाबत**

**(१०) * २७९४५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्तांनी कर्मचारी/अधिकारी यांना प्रभारी पदभार व संवर्गबाहय नियुक्त्या देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभारी नियुक्त्यांना ६ महिन्यांपेक्षा अधिक काळापर्यंत मुदतवाढ द्यावयाची असल्यास शासनाची मंजूरी घेतलेली नाही, त्याचप्रमाणे महानगरपालिकेने प्रभारी पदाचा पदभार देण्यासाठी कर्मचा-यांची यादी व त्यांची पूर्वमंजूरी देखील घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचा-यांना मुदतवाढ देण्यासाठी शासनाने मंजूरी दिली आहे काय, तसेच, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्तांनी नियमबाह्य कार्यवाही केल्यामुळे त्यांचेविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-अ, गट-ब आणि गट-क संवर्गातील रिक्त असलेल्या पदांवर देण्यात आलेल्या प्रभारी आणि अतिरिक्त कार्यभाराचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

गट-अ :- ५ अतिरिक्त कार्यभार आणि ११ प्रभारी कार्यभार.

गट-ब :- २० प्रभारी कार्यभार.

गट-क :- १४ अतिरिक्त कार्यभार.

हे कार्यभार आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या मान्यतेने देण्यात आले आहेत.

(२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदांवर नेमणूका करण्यात आल्या नसून केवळ कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या मान्यतेने अतिरिक्त कार्यभार/प्रभारी पदभार देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेने मक्त्याने दिलेल्या मालमत्तांचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(११) * २७२५३ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या ४१७७ मालमत्ता असून त्यापैकी २३६ भूखंडाचा मक्ता करार संपून २ ते ३ वर्षाचा कालावधी होवून नुतनीकरण न करता त्या मालमत्तांवर उद्योग सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार सदर मक्त्यावरील मालमत्ता कराचे नुतनीकरण अथवा ताबा घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) महानगरपालिकेने मक्त्याने दिलेल्या ४१७७ मालमत्तांपैकी २५५ मालमत्तांची मुदत संपुष्टात आलेली आहे.

मक्ता संपुष्टात आलेल्या २५५ मालमत्तांपैकी १०३ मालमत्ता अनुसूची 'डब्ल्यु' अंतर्गत राज्य शासनाच्या मालकीच्या आहेत. तसेच, अनुसूची 'व्ही' अंतर्गत १७ मालमत्ता पोलीस विभागास मक्त्याने देण्यात आल्या आहेत व महापालिकेच्या १३५ मालमत्ता आहेत.

- मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, मक्ता नुतनीकरणाची कार्यवाही करण्याबाबत दिनांक १५ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस निदेश देण्यात आले आहेत.
- मक्ता संपुष्टात आलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तांच्या मक्ता नुतनीकरणाबाबत महानगरपालिकेने सन २००१-२००२ मध्ये निश्चित केलेल्या धोरणानुसार मक्ता नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येते.
- तथापि, अनधिकृत बांधकामे करण्यात आलेल्या तसेच, मक्ता अटी व शर्तींचा भंग झालेल्या महानगरपालिकेच्या मालमत्तांच्या मक्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात येत असून, त्यानुसार मक्ता कालावधी संपुष्टात आलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या १३५ भुभागांचे मक्ता नुतनीकरण करण्यात येणार आहे.
- तसेच, अनुसूची 'व्ही' मधील १७ भुभागांच्या मक्ता नुतनीकरणाबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) जवळील कोपरगाव येथे रस्ता रुंदीकरणात बाधित बांधकाम धारकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१२) * २८३२९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) जवळील कोपरगाव येथे रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणा-या अतिक्रमणावर महानगरपालिकेने कारवाई केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारवाई थांबविण्यासाठी बाधित कुटुंबातील महिलांनी रस्त्यावर उतरुन ठिय्या आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या बाधित कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास योजनेमध्ये मौजे कोपर, डोंबिवली (पश्चिम) येथील कोपरगाव येथे १५ मीटर रुंदीचा विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे.

या रस्त्यामुळे बाधित होणारी बांधकामे सर्व कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करुन महानगरपालिकेने दिनांक २७/१२/२०१६ रोजी निष्कासित केली आहेत.

(२) या रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या काही बांधकाम धारकांनी निष्कासनाच्या कारवाईवेळी त्यांची बांधकामे तोडण्यास विरोध केला होता.

तथापि, महानगरपालिकेने याबाबतची कायदेशीर प्रक्रिया पुर्ण केली असल्याने तसेच पालिकेच्या धोरणानुसार बाधित बांधकाम धारकांचे पुनर्वसन महानगरपालिकेकडून करण्यात येणार असल्याची बाब नागरिकांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर नागरिकांनी रस्ता रुंदीकरणास सहकार्य केले आहे.

(३) या रस्ता रुंदीकरणामुळे एकूण ९२ सदनिका/गाळाधारक बाधित झाले आहेत. यापैकी ३५ सदनिका/गाळे धारकांनी पुनर्वसनाकरीता आवश्यक असलेली कागदपत्रे महानगरपालिकेस सादर केली आहेत. महानगरपालिकेच्या पुनर्वसन धोरणानुसार या बाधित बांधकाम धारकांच्या पुनर्वसनाबाबतची पात्रता निश्चित करण्याची प्रक्रिया महानगरपालिकेकडून सुरु आहे.

उर्वरित बाधित बांधकामधारकांनी आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर त्यांच्या पात्रता निश्चितीची कार्यवाही प्रस्तावित असल्याचे आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाथरी (जि.परभणी) येथील श्री.साईबाबांच्या**
**जन्मभुमीतील विकास आराखड्याबाबत**

**(१३) * २७७८४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४५१६ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील श्री.साईबाबांच्या जन्मभुमीतील विकास कामांसाठी मा.मुख्यमंत्री महोदयांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून अहवाल मागितला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.साईबाबा जन्मभूमी विशेष कृती आराखड्याच्या ३५ कोटी रुपयांच्या रक्कमेस मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आराखडा व निधी मंजुरीबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जिल्हाधिकारी, परभणी यांनी श्री.साईबाबा यांच्या जन्मभूमीचा विकास आराखडा सादर करण्याबाबत मुख्याधिकारी, पाथरी नगरपरिषद यांना सूचित केले आहे.

(२) होय.

(३) पाथरी, जि.परभणी येथील श्री.साईबाबा जन्मभुमी विकास आराखडा बनविण्याचे काम अंतिम टप्यात आहे.

सदर आराखडा लवकरात लवकर शासनास सादर करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी, परभणी यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मिरा-भाईंदर शहरात प्रधानमंत्री आवास योजना राबविण्याबाबत**

**(१४) * २९३१३ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर शहर झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी येथील ४६ झोपडपट्ट्यांसाठी प्रधानमंत्री आवास योजना राबविण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना राबविण्यात येणार आहे त्याठिकाणच्या ४६ पैकी बहुतांश झोपडपट्टया एकतर सीआरझेड अथवा ना विकास क्षेत्रात येतात किंवा त्या खार जमिनीवर वसलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना राबविताना सीआरझेड अथवा ना विकास क्षेत्राबाबत शासन फेरविचार करणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

"सर्वांसाठी घरे" संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यातील नागरी क्षेत्रात अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेची निवड करण्यात आली असून महानगरपालिकेच्या हद्दीतील एकूण ४६ झोपडपट्टयांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करण्याचे काम मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून सुरु आहे.

(२) या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील काही झोपडपट्टया सी.आर.झेड./खार जमीन क्षेत्रात, तर काही झोपडपट्टया ना-विकास क्षेत्रात येत आहेत.

(३) या झोपडपट्टयांचे सर्वेक्षण झाल्यानंतर महानगरपालिकेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल.

तद्नंतर सी.आर.झेड. संदर्भात आणि विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार महानगरपालिकेकडून संबंधित सक्षम प्राधिकरणांच्या मान्यता घेण्यात येतील, असे आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील राबोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत भोंदूबाबाने नागरिकांची फसवणूक केल्याबाबत

**(१५) * २७३९५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील राबोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका भोंदूबाबाने जादूटोण्याच्या नावाखाली सुमारे ५,९७,०००/- रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) सदरहू प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ -१ मधील क्षेत्रात राबोडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.३२५/२०१६ भा.दं.वि.कलम ४२० सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम, २०१३ चे कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन प्रकरण तपासाधिन आहे. या प्रकरणात २ आरोपींनी अटकपुर्व जामीन घेतलेला आहे व १ आरोपीने मा.जिल्हा सत्र न्यायालय, ठाणे यांचेकडे जामीनासाठी अर्ज केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष यांच्या बेहिशेबी मालमत्ता प्रकरणाबाबत

**(१६) * २८१४५ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष कृपाशंकर सिंह यांच्या बेहिशेबी मालमत्ता प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने तपास अहवाल सादर करण्याचे शासनाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला (एसीबी) दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास अंतिम आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी मा.न्यायालयात तपास अहवाल सादर करण्यास एसीबीकडून होत असलेला विलंब व याकडे केलेल्या दुर्लक्षाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी आर्थिक आमिष घेवून तपास अहवाल हेतूपुर्वक मा.न्यायालयात सादर न करणा-या दोषी एसीबी अधिका-यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त तपास अहवाल विनाविलंब मा.न्यायालयात सादर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) श्री.कृपाशंकर सिंह यांच्या बेहिशेबी मालमत्तेच्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ०५/०४/२०१० रोजी उघड चौकशी सुरु केली होती. दरम्यान तक्रारदाराने मा.उच्च न्यायालयात याप्रकरणी जनहित याचिका क्र.५१/२०१० दाखल केली होती. या प्रकरणाबाबतचा प्रगती अहवाल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मा. उच्च न्यायालयात सादर केला होता. या याचिकेच्या दिनांक २२/०२/२०१२ च्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने सदर तपास पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना सोपविला आहे. त्यामुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या प्रकरणाची संपुर्ण कागदपत्रे पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे वर्ग केली आहे. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी या प्रकरणी निर्मल नगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला असुन मा. विशेष न्यायालयात दिनांक २१/०४/२०१५ रोजी दोषारोप पत्र दाखल केले आहे.

याशिवाय याचिका क्र. ४३५७/२०१४ वरील दिनांक ०९/०१/२०१७ रोजीच्या सुनावणीवेळी मा.न्यायालयाने या प्रकरणाचा पुर्तता अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असल्याने पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिनांक २१/०१/२०१७ रोजी प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना उपरोक्त वस्तुस्थितीबाबतचा प्रगती अहवाल सादर केलला आहे.

-----------------

**राज्यातील नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातील मराठी माध्यमांच्या शाळांना निवासी दराने मालमत्ता कराची आकारणी करणेबाबत**

**(१७) * २७६०२ डॉ.अपूर्व हिरे, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक २३६७३ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्रातील सर्वच मराठी माध्यमांच्या मान्यता प्राप्त अनुदानित शाळा, महाविद्यालयांना निवासी दराने कराची आकारणी व्हावी अशी मागणी शैक्षणिक संस्थांकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनस्तरावरून प्रश्नोक्त मागणीचे अनुषंगाने प्रस्तुत बाब तपासण्याचे प्रस्तावित असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शैक्षणिक संस्थांना निवासी दराच्या दुप्पट दराने मालमत्ता कराची आकारणी होत असल्याचे पार्श्वभुमीवर प्रश्नोक्त मागणीचे अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

काही महानगरपालिकांकडे निवासी दराने कराची आकारणी व्हावी अशी मागणी शैक्षणिक संस्थांकडून करण्यात येत आहे.

(२) खरे आहे.

(३) संबंधित महानगरपालिकांकडून अहवाल प्राप्त करण्यात येत असून त्यानुसार धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेने डॉप्लर यंत्रणा बसवण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१८) * २७७३० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवामान व पावसाच्या अंदाजाविषयी नेमकी माहिती देणारी डॉप्लर यंत्रणा बसवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने जागा उपलब्ध करुन दिली नसल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदर डॉप्लर यंत्रणा उभारण्यासाठी भारत मौसम विज्ञान विभाग यांना वेरावली उच्चस्तर जलाशय येथील जागा पोचरस्त्यासह देण्यास तसेच त्यासाठी प्रतिवर्षी रुपये ९००/- इतके भुईभाडे, रुपये ५५,९६,८७५/- इतके एकरकमी अधिमुल्य व पोचमार्गाबाबत विहित परवानाशुल्क आकारण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १९/१२/२०१६ रोजी मंजुरी दिली आहे.

तथापि, अधिमुल्य व पोचमार्गाबाबतचे परवानाशुल्क माफ करण्याविषयी भारत मौसम विज्ञान विभागाने विनंती केली असल्यामुळे, सदर ठराव सुधार समिती/महानगरपालिका यांच्या मंजुरीसाठी पुन्हा सादर करण्यात येणार आहे.

सदर जागेचा आगाऊ ताबा भारत मौसम विभाग यांना देण्याची पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. त्यामुळे सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

-----------------

**बांद्रा-कुर्ला संकुल (मुंबई) येथे इंटरनॅशनल फायनानन्शियल सर्विसेस सेंटर विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्याबाबत**

**(१९) * २६९४८ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांद्रा-कुर्ला संकुल (मुंबई) येथे “आयएफएसी” ची उभारणी करण्यासाठी जादा चटईक्षेत्र निर्देशांक देऊन तेवढे बांधकाम क्षेत्र उपलब्ध करुन दिले जाईल असे नमूद करून राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावास केंद्र शासनाने संमती दिली आहे काय,

(३) असल्यास, बांद्रा-कुर्ला संकुलात आर्थिक विशेष क्षेत्र म्हणून आयएफएसीला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे बांद्रा-कुर्ला संकुल येथे इंटरनॅशनल फायनानन्शियल सर्विसेस सेंटर विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करणार आहे. सदरच्या विशेष आर्थिक क्षेत्रासाठी किमान ५० हेक्टर जमिनीची पूर्तता झाली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्वत:ची ५२.२८ हेक्टर जमीन आहे. प्रकल्पाची अंदाजित गुंतवणुक रुपये १२०१४.०० कोटी असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्वत:च्या निधीतून करणार आहे. विशेष आर्थिक क्षेत्रांच्या प्रस्तावाची छाननी करण्याकरिता गठीत असलेल्या उच्चाधिकार समितीच्या दिनांक १०/२/२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये प्रकल्पासाठी लागणारी वीज व पाणी याची पूर्तता झालेली असल्याबाबत चर्चा झालेली असून सदर प्रस्ताव औपचारिक मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे शिफारस करणेस मंजूरी देणेत आलेली आहे. त्यानुसार उद्योग, उर्जा व कामगार विभागाने दिनांक २२/२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रस्ताव केंद्र शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळालेनंतर राज्य शासनाकडून पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) नगरपालिकेच्या व्यायाम शाळेची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२०) * २९५२४ श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक २६१८७ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) येथील एस.टी. बसस्थानकासमोरील खेळाच्या मैदानावरील व्यायाम शाळेची दुरवस्था झाली असून दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार व्यायाम शाळेच्या इमारतीच्या बांधकामाला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही नगरपालिका, जव्हार यांचेकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार व्यायामशाळेच्या इमारतीच्या बांधकामाला प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेऊन व्यायाम शाळेची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

जव्हार येथील एस.टी बस स्थानका समोरील खेळाच्या मैदानामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या नवीन व्यायामशाळेच्या इमारतीच्या संकल्पचित्र व नकाशे यास नगररचना, पालघर यांच्याकडून दिनांक ०७/०१/२०१७ रोजी मंजूरी प्राप्त झालेली आहे.

सदर कामाच्या रुपये १४.०४ लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक ०२/०३/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(२) याबाबत मुख्याधिकारी, नगरपरिषद जव्हार यांच्याकडून विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून व्यायामशाळेचे काम सुरु करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाड (जि.रायगड) येथील डी.जी. इन्फ्रास्ट्रक्चर कारखाना बंद केल्याबाबत**

**(२१) * २७४०२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रातील डी.जी. इन्फ्रास्ट्रक्चर हा कारखाना कामगारांना कोणतीही पूर्व सूचना न देता माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अचानकपणे बंद करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे आमशेत गावातील व परिसरातील स्थानिक कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) मे. डीजी इन्फास्ट्रक्चर या कारखान्याच्या व्यवस्थापनाने दिनांक १९/०१/२०१७ रोजीच्या नोटीसीद्वारे आस्थापनेत टाळेबंदी जारी केली आहे, हे खरे आहे.

(२) कारखान्यात जारी केलेल्या टाळेबंदीमुळे ८१ कामगार परिणामित झाले असून सन २०१५ मध्ये झालेल्या वेतनवाढीच्या करारानुसार कामगारांना माहे सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१६ या ३ महिन्यांचे वाढीव वेतन वगळता माहे डिसेंबर, २०१६ पासून वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे.

(३) होय.

चौकशीअंती सदरहू कारखान्यातील उत्पादित मालाच्या मागणीस खीळ बसल्याने तात्पुरत्या स्वरुपात ७५% कामगार संख्या कमी करण्यासंदर्भात व्यवस्थापनाने कारखान्यात कार्यरत असलेल्या दोन संघटनांना दिनांक ३१/१२/२०१६ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या प्रस्तावास संघटनांनी प्रतिसाद न दिल्याने व सततच्या कामगार असंतोषामुळे विपरित घटना घडू नये, याकरिता व्यवस्थापनाने दिनांक १९/०१/२०१७ रोजीच्या नोटीसीद्वारे अनिश्चित कालावधीकरिता टाळेबंदी जारी केली असल्याचे आढळून आले आहे.

उभयपक्षांमध्ये तडजोड घडवून आणण्याकामी कामगार उपायुक्त, रायगड यांचेमार्फत व्यवस्थापकीय संचालक सेवा योजनांतर्गत दिनांक ३१/१/२०१७, दिनांक १७/२/२०१७ व दिनांक २८/२/२०१७ रोजी बैठका घेण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याबाबत**

**(२२) * २७३१२ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी २० हजार घरे बांधण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुर्बल घटकांसाठी घरे किती कालावधीत बांधण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश मेहता :** (१), (२), (३) व (४) मा.पंतप्रधान, भारत सरकार यांनी जून, २०१५ मध्ये सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची घोषणा केली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने मंत्रिपरिषदेच्या मान्यतेने दिनांक ९/१२/२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यामध्ये ५१ शहरांचा समावेश करण्यात आला आहे. केंद्र शासनाने नव्याने ९१ शहरांच्या समावेशनास मान्यता दिली असून आता सदर योजना राज्यात एकूण १४२ शहरात राबविण्यात येणार आहेत. सदर योजना ४ घटकात राबविण्यात येणार असून ती प्रामुख्याने आर्थिक दुर्बल घटकातील लाभार्थ्यांसाठी आहे.

मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांना सुकाणू अभिकरण (Nodal agency) नियुक्त केले आहे.या योजनेचे सर्व प्रस्ताव सुकाणू अभिकरणामार्फत (म्हाडा) राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती मार्फत सादर करण्यात येतात. त्यानुसार पुणे शहरांकरिता पुणे महानगरपालिकेकडून एकही प्रस्ताव सुकाणू अभिकरणास (म्हाडा) प्राप्त झालेला नाही. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पुणे विभागीय मंडळामार्फत १० प्रकल्पांतर्गत ४०७८ घरकुलांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

-----------------

**राज्यातील माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगाचे थकीत वेतन देण्याबाबत**

**(२३) * २९९४७ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातील शिक्षकांना दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी देण्यात आली असून थकीत वेतन देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शिक्षकांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ रोजी आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे, तद्नुसार शिक्षकांना त्याचे थकीत वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

राज्यातील माध्यमिक व्यवसाय शिक्षण संस्थांमध्ये शिक्षकांची पदे मंजूर नसून निदेशक व सहाय्यक अधिव्याख्याता अशी पदे मंजूर आहेत. सदर मंजूर पदांना दिनांक १/१/१९९६ पासून पाचव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून त्यांना देय रक्कमा अदा करण्यात आल्या आहेत.

(२) माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमातील कर्मचाऱ्यांनी आंदोलन केलेले नाही. तथापि, दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ रोजी उच्च माध्यमिक विभागाकडील पूर्णवेळ शिक्षकांनी धरणे आंदोलन सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती/नागपूर या दोन विभागात केलेले आहे.

(३) पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शालेय शिक्षकांना शासन निर्णय दिनांक २६/२/२०१४ अन्वये दिनांक १/१/१९९६ पासून सुधारीत वेतनश्रेणी रुपये ७२२५-२२५-११५०० (मुळश्रेणी), रुपये ८०००-२७५-१३५०० (वरिष्ठश्रेणी) व २० % पदांसाठी रुपये ९१२५-२७५-१४०७५ (निवडश्रेणी) लागू करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अशासकीय अनुदानित शाळेतील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थेतील पूर्णवेळ शिक्षकांना सदर वेतनश्रेणी दिनांक ८/१२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये, दिनांक १/१/१९९६ पासून लागू करण्यात आलेली आहे.

तथापि सदर शिक्षकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ दिनांक १/४/२०१४ पासून देण्यात आला असून दिनांक १/४/२०१४ पूर्वीची थकबाकी अनुज्ञेय नाही. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई येथे स्मार्ट बीकेसी उभारण्याबाबत**

**(२४) * २८५६५ श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलाप्रमाणे नवी मुंबई येथे स्मार्ट “बीकेसी” उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नवी मुंबई येथील खारघर नगरातील प्रभाग क्र. २८, २९, ३१, ३२ व ३३ येथील सुमारे १३२ हेक्टर एवढ्या क्षेत्रावर ‘नवी मुंबई कार्पोरेट पार्क’ या नावाने बीकेसीच्या धर्तीवर व्यावसायिक संकुल उभारण्याचा प्रस्ताव सिडको संचालक मंडळाने दिनांक २७/१/२०१६ रोजीच्या बैठकीत मंजूर केला आहे.

सदर प्रकल्पाबाबत वर्तमानपत्रात दिनांक २०/१/२०१७ रोजी जाहिरात प्रकाशित करुन सल्लागारांकडून ‘स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव’ (ईओआय) आमंत्रित केले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर व पुणे येथे मा.उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ सुरु करण्याबाबत**

**(२५) * २८५७२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अनिल भोसले : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक १९७७२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालय, मुंबईचे खंडपीठ कोल्हापूर व पुणे येथे व्हावे या मागणीसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, सोलापूर व पुणे जिल्हयातील वकील संघटना तसेच सदरहू जिल्हयातील नागरिकांनी मागील ३२ वर्षापासून लेखी निवेदनाद्वारे निर्देशने करून, आंदोलने करून तसेच मा.मुख्यमंत्री, मा.विधी व न्याय मंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेवून वारंवार मागणी केलेली असतानाही आजमितीस मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर व पुणे येथे सुरू करण्यासाठी शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खंडपीठाच्या मागणीकडे शासनाचे पुन्हा लक्ष वेधण्यासाठी मागील ४४ दिवसांपासून वकील संघटनाच्यावतीने तसेच त्या परिसरातील अशिलांच्यावतीने आंदोलने सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आंदोलन अधिक तीव्र करण्यासाठी दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास सदरहू ६ जिल्हयातील जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिलदार कार्यालयावर मोटारसायकल रैलीने जावून एक सविस्तर निवेदन शासनाला देण्याचा निरधार करण्यात आला आहे असे कृती समितीचे निमंत्रक ॲड. प्रकाश मोरे यांनी जाहिर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर व पुणे येथे मा.उच्च न्यायालय, मुंबईचे खंडपीठ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) याबाबत काही जिल्हयांमध्ये स्थानिक बार असोसिएशनमार्फत निवेदने देण्यात आलेली आहेत.

(४) खंडपीठ स्थापनेच्या सततच्या मागणीस अनुसरुन मा.मुख्य न्यायमूर्तींनी मुंबई उच्च न्यायालयातील तीन न्यायमूर्तींची समिती गठीत केली आहे. या समितीचा अहवाल अद्यापि अप्राप्त आहे. मा.उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन होण्यास काहीसा कालावधी लागू शकतो ही बाब विचारात घेऊन कोल्हापूर येथे मा.उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्यात यावे तसेच पुणे येथे अशा प्रकारचे फिरते खंडपीठ स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार व्हावा, अशी शिफारस शासनाने मा. मुख्य न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय यांना केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरात नव्याने उभारण्यात येणा-या इमारतींमध्ये ओल्या कच-यापासून खतनिर्मिती बंधनकारक करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२६) * २९२४९ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात नव्याने उभारण्यात येणा-या इमारतींमध्ये ओल्या कच-यापासून खतनिर्मिती करण्यात येणार असून घर विकताना विकासकाने रहिवाशांना तशी अट घालणे बंधनकारक केले असून विकास नियंत्रण नियमावलीत याबाबत तरतूद करण्याचा प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनाने मांडला असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यास मंजूरी मिळवून विकास नियंत्रण नियमावलीत याचा समावेश करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सदरील कचरा प्रक्रियेचा प्रस्ताव केव्हापासून अंमलात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) ते (४) प्रस्तुत प्रस्ताव प्राथमिक कार्यवाहीमध्ये आहे. सदर प्रस्तावास सुधार समितीची मंजूरी प्राप्त असून महानगरपालिका सभागृहाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ खाली वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी महानगरपालिकेकडून सादर झाल्यानंतर शासनाची त्यास मंजूरी मिळणे अभिप्रेत आहे. त्यानंतर याबाबतचे विनियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट होतील.

---------------------

**कश्यपी (जि.नाशिक) धरणग्रस्तांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत**

**(२७) * २८२१३ श्री.जयवंतराव जाधव : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक १९३३६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कश्यपी (जि.नाशिक) धरणासाठी सन १९९२ मध्ये जमीन दिलेल्या प्रकल्पग्रस्तांनी स्वातंत्र्यदिनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास धरणात उड्या घेत जलसमाधी घेण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील धरणग्रस्तांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयासमोर उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त धरणग्रस्तांना कराराप्रमाणे नाशिक महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याची मागणी रास्त असून करारनाम्याच्या अनुषंगाने तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्याचे जिल्हाधिकारी, नाशिक यांनी आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना दिनांक ३ डिसेंबर, २०१५ रोजी सूचना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांच्या न्याय मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कश्यपी प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी धरणात उड्या घेतल्या ही वस्तुस्थिती आहे.

(२) होय.

(३) जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ०३/१२/२०१५ च्या पत्रान्वये, कश्यपी धरणग्रस्तांच्या नाशिक महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याच्या मागणीच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना कळविले आहे.

(४) या अनुषंगाने आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी प्रस्ताव शासनास सादर केलेला होता.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७/९/२०१० च्या शासन निर्णयानुसार, प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या या जाहिरात देऊन व त्यांची सेवा प्रवेश अर्हता व गुणवत्ता विचारात घेऊन करणे आवश्यक असल्याने, त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत नाशिक महानगरपालिकेस दिनांक १८/३/२०१६ रोजी सूचित करण्यात आले होते.

तद्नंतर सदर प्रश्नाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर सुधार प्रन्यासतर्फे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलांच्या कामाचे भूमीपूजन केल्याबाबत**

**(२८) * २६८६८ श्री.प्रकाश गजभिये** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यासतर्फे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागपूर येथे १२०६८ घरकुलांच्या कामाचे भूमीपूजन माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरकुलांच्या बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे काय, तसेच यास किती खर्च येणार असून घरकुलांचे बांधकाम केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) नागपूर सुधार प्रन्यासतर्फे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बांधण्यात येणा-या १०,००० प्रस्तावित घरकुलांपैकी एकंदरीत १२६८ घरकुलाच्या कामाचे भूमीपूजन दिनांक ०१/०१/२०१७ रोजी करण्यात आले आहे.

(२) व (३) या १२६८ घरकुलासाठी एकंदरीत रु.१२९.७६ कोटीचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) मंजूर करण्यात आला आहे.

सदरचे काम सद्य:स्थितीत निविदा स्तरावर असून, या प्रकल्पाच्या कामावर येणारा खर्च निविदा निश्चितनंतर कायम होणार आहे.

या निविदेमध्ये कामाची एकूण कालमर्यादा ३६ महिन्याची आहे. परंतु प्रती जागा (Land Parcel) बांधकामाची मुदत १५ महिने आहे व या कामासाठी ना-हरकत प्रमाणपत्र व नकाशे मंजुरीकरिता ३ महिने मुदत प्रस्तावित आहे.

-----------------

**राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत**

**(२९) * ३०२०० श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आय.टी.आय.) शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना गत अनेक वर्षापासून केवळ चाळीस रुपये विद्यावेतन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या महागाईच्या काळात सदर विद्यावेतन अतिअल्प असल्याने विदयार्थ्यांकडून विदयावेतनात वाढ करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील एकूण प्रशिक्षणार्थींपैकी आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या प्रशिक्षणार्थींना दरमहा रुपये ४०/- तसेच मागासवर्गीय प्रशिक्षणार्थींना दरमहा रुपये ६०/- याप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते.

(२) होय.

(३) व (४) औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांचे विद्यावेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या प्रस्तावाबाबत**

**(३०) * २७४८० श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचा ९८ हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव कार्यान्वित करण्याचा राज्य शासनाचा विचार असून त्यासाठी शासनाचा वाटा म्हणून एमएमआरडीए मार्फत २४ हजार कोटी रुपयांचा भार उचलण्यात येणार आहे, तसेच या प्रकल्पासाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील सुमारे साडेपाच हेक्टर जागा देण्याची तयारी शासनाने दर्शविलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बुलेट ट्रेन प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व राज्यातील विकासाला या प्रकल्पामुळे हातभार लागणार असल्याचे अपेक्षित धरुन उक्त खर्चाचा भार उचलण्याची शासनाने तयारी दर्शविलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई-नागपूर बुलेट ट्रेनचाही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून या प्रस्तावाचे स्वरूप काय आहे व यासाठी शासन किती आर्थिक भार उचणार आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत: खरे आहे. मुंबई-अहमदाबाद या जलदगती रेल्वे प्रकल्पासाठी स्थापन करण्यात येणा-या विशेष उपयोजिता वाहनात २५ % भागभांडवल देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सुसाध्यता अहवालानुसार वर्ष १२-१३ च्या आधारभूत किंमतीप्रमाणे सदर रेल्वे प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ९७६३९.०० कोटी आहे. प्रकल्पासाठी स्थापन करावयाच्या विशेष-उपयोजिता वाहनातील २५% प्रमाणे महाराष्ट्र राज्याचा भागभांडवल हिस्सा रु. ५०००.०० कोटी इतका आहे. वांद्रे-कुर्ला संकुलातील स्थानकाच्या बांधकामाकरीता भूपृष्ठावरील केवळ ०.९ हेक्टर (९००० चौ.मी.) जमिनीची आवश्यकता आहे, असे रेल्वे मंत्रालयाने कळविले आहे.
(२) प्रकल्पाच्या सुसाध्यता अहवालावर विचारविनिमय करणे, आर्थिक व्यवहार्यता तपासणे व सुयोग्य शिफारशी करणे यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठित केली आहे. उपसमितीच्या अहवालावर शासनाच्या आर्थिक सहभागाविषयी मंत्रिमंडळाचे स्तरावर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

रेल्वे मंत्रालयाने केलेल्या सुसाध्यता अहवालानुसार प्रस्तुत प्रकल्पाची लांबी ५०८ कि.मी. असून त्यामध्ये राज्यातील मुंबई, ठाणे, विरार व बोईसर या स्थानकांचा समावेश आहे. प्रवासाचा अपेक्षित कालावधी २.०७ तास ते २.५८ तास इतका आहे. या प्रकल्पामुळे मुंबई शहराखेरीज ठाणे, वसई-विरार, बोईसर-तारापूर-पालघर पट्टयातील प्रवाश्यांना तसेच उद्योग जगतास लाभ होणार आहे. प्रस्तुत प्रकल्पामध्ये राज्य शासनाने आर्थिक सहभाग घेतल्यास आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र व मुंबईतील इतर वाहतूक विषयक प्रकल्पांकरीता हा प्रकल्प पूरक होणार असून त्याव्दारे नवीन तंत्रज्ञानाची उपलब्धता, पायाभूत सुविधामधील गुंतवणूक, कर्बवायु उत्सर्जनावर नियंत्रण इ. लाभ होणार आहेत.

(३) होय. रेल्वे मंत्रालयाच्या स्तरावर सुसाध्यता अभ्यास केला जात आहे. अद्याप सविस्तर प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाकडून प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाने चाकण औद्योगिक क्षेत्र व परिसरातील अवैध बांधकामांवर कारवाई न केल्याबाबत

**(३१) * २७१४८ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) चाकण औद्योगिक क्षेत्र व परिसरातील खराबवाडी, नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, महाळुंगे, खालुंब्रे, कुरळी व निघोजे मधील अनेकांना अवैध बांधकाम केल्याप्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ अन्वये प्राधिकरणाच्या अनधिकृत बांधकाम व निष्कासन पथक क्रमांक २ चे प्रभारी उपअभियंता यांनी नोटीसा बजावल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार किती ठिकाणी कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ अन्वये दिलेल्या नोटीसीबाबतचे उत्तर प्राप्त झाल्यानंतर करावयाची कार्यवाही पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या स्तरावर सुरू आहे.

-----------------

## अमरावती महानगरपालिकेला सुरक्षारक्षक पुरविणाऱ्या अमृत एजन्सीने अपहार केल्याबाबत

**(३२) * २८०७२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेला सुरक्षारक्षक पुरविणाऱ्या अमृत एजन्सीने इपीएफ, इएसआयसी आणि सेवाकराच्या कपातीमध्ये जवळपास ४० लाख रुपयांचा अपहार केला असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी महानगरपालिकेच्या मुख्य लेखाधिकारी व उपायुक्त यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य लेखाधिकारी व उपायुक्त यांचेवर तसेच अमृत एजन्सीच्या संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अपहार झालेल्या रकमेच्या वसूलीकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडाळा परिसरात विकासकाने अनधिकृतरित्या टॉवर्स उभारल्याबाबत

**(३३) * ३०२७४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) पूर्वेकडील वडाळा परिसरात राम मंदिराशेजारी ‘भव्य हाईट्स’ या नावाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पर्यावरण कायद्याचा भंग करीत विकासकाने अनधिकृतरित्या खुल्या बाजारातील विक्रीसाठी उत्तुंग टॉवर उभारला आहे तसेच त्यापैकी एका टॉवरची जाहिरातही देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'भव्य हाईट्स' या नावाने वडाळयातील राम मंदिराशेजारी उभारलेल्या टॉवरसाठी आजुबाजुला असलेल्या रामनगर आणि विठ्ठल-रखुमाई सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच सदगुरु झोपु सहकारी गृहनिर्माण संस्था अशा तीन योजना एकत्र करून या योजनांचा एकूण आकार २० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक होऊनही रितसर परवानगी न घेता बांधकाम सुरू करण्यात आले असल्याने राज्याच्या पर्यावरण विभागाचे सचिव, झोपु प्राधिकरणाचे मुख्य अधिकारी तसेच राष्ट्रीय हरीत लवादाच्या पश्चिम विभागाने विकासकाला नोटीसा बजावलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भूखंडांतर्गत महानगरपालिकेच्या वसाहती तसेच काही मोकळे भूखंड असल्याने ही योजना विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत राबविण्यात यावी अशी तेथील रहिवाशांनी मागणी केलेली असतानाही रहिवाशांचे म्हणणे ऐकून न घेता या योजना झोपु अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) सि.स.क्र.२९८ (पै), २९९ ते ३०५ व ३०६ (पै), म्हणजेच अंतिम भूखंड क्र. २४, २५, २६, ३५, ३६ व ३७ वडाळा इस्टेट या मिळकतीवर रामनगर सह. गृह. संस्था, विठ्ठल रखुमाई सह. गृह. संस्था, सदगुरु सह. गृह. संस्था, समता सह.गृह.संस्था व संत रोहिदास सह.गृह.संस्थांची एकत्रिकरण करण्यात आलेली झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहे. सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस पर्यावरण विभागाने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिली आहे. त्यामध्ये सदरहू क्षेत्रावरील विक्री घटकातील इमारत क्र.४ (अे,बी,सी,डी विंग) (भव्य हाईट्स) चा समावेश आहे.

सदरहू झोपु योजनेच्या विक्री घटकातील इमारतीबाबत विकासकाने दिलेल्या जाहिरातीची माहिती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी कळविले आहे.

(२) सदर योजनेसंदर्भात पर्यावरण विभागाने संबंधित विकासकास पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या कलम ५ अन्वये दिनांक २५/३/२०१५ रोजी नोटीस बजावली होती. याबाबत पर्यावरण विभागाकडील सुनावणीअंती सदरची नोटीस दिनांक २६/५/२०१५ रोजी मागे घेण्यात आली आहे. यासंदर्भात श्री.ऑस्टीन फ्रान्सिस डिसोझा यांनी राष्ट्रीय हरित लवाद, पश्चिम विभाग यांचेकडे अपिल क्र.३/२०१७ दाखल केले आहे. सद्य:स्थितीत सदरचे अपिल प्रलंबित आहे.

(३) व (४) हे खरे आहे. तथापि, सदरहू योजनेत समाविष्ट महापालिकेच्या लाल विटाची चाळ ही महापालिकेची भाडेकरु मालमत्ता होती. सदर चाळ असलेला भूखंड हा ९० फूट रुंदीच्या (रस्ता रुंदीकरण) नियमित रेषेने बाधित होत असल्याने विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत पुनर्वसन करण्यासाठी भूखंड उपलब्ध होणार नसल्यामुळे तसेच सदर भूखंडावरील पी.जी. रिझर्व्हेशन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अबाधित ठेवणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेवून विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) अंतर्गत आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन केले नसते तर संबंधितांना इतरत्र पर्यायी सदनिका देवून स्थलांतरीत करणे आवश्यक होते. यास्तव ३३(७) अंतर्गत मागणी विचारात घेण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिडको महामंडळातील लिपीकवर्गीय उमेदवारांना कायम करणेबाबत

**(३४) * २७०३१ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको महामंडळामार्फत सन २००९ मध्ये मागासवर्गीयांकरीता राखीव असलेल्या लिपीक या पदासाठी जाहिरात देण्यात आली होती व सदरच्या जाहिरातीनुसार ही भरती कंत्राटी पध्दतीने केली असली तरी या पदासाठी लेखी परीक्षा, मौखिक परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा ही घेण्यात आलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या जाहिरातीनुसार निवड झालेले २७ उमेदवार सद्यस्थितीत महामंडळात कार्यरत असताना अद्याप त्यांना कायम करण्याविषयी महामंडळामार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बिंदुनामावलीप्रमाणे जागा रिक्त असल्याने नवीन जाहिरात देऊन अ.जा, अ.ज. या प्रवर्गाची नव्याने भरती करून त्यांना कायम करण्यात आले आहे, तसेच हाच नियम सन २००९ मध्ये भरती प्रक्रियेत निवड झालेल्या व जात पडताळणी पूर्ण असणाऱ्या उमेदवारांना लागू करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन सन २००९ मध्ये निवड झालेल्या उमेदवारांनाही कायम करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय. सन २००९ मध्ये सिडको महामंडळाने लिपिक-टंकलेखक, वाहनचालक, शिपाई तसेच व्यवस्थापक (अर्बनहाट) ही पदे कंत्राटी तत्वावर जाहिरातीद्वारे भरली आहेत.

सदर पदभरती करतांना त्यांची शैक्षणिक अर्हता तपासून लेखी परिक्षा व मौखिक परिक्षा घेण्यात आली होती. कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत सिडको महामंडळाचे धोरण नसल्याने या कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, या कर्मचाऱ्यांना सिडको महामंडळाच्या दिनांक ६/९/२००२ रोजीच्या परिपत्रकानुसार कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या बहुतांशी सोयी-सुविधा लागू करण्यात आल्या आहेत.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली परिसरातील बंदुकाचे बनावट परवाने तपासण्यासाठी शोधमोहिम राबविण्याबाबत**

**(३५) * २९७३८ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथे कल्याण शिळफाटा मार्गावरील गोळवली गावात राहणा-या एका व्यक्तीला बंदुकीचा बनावट परवाना वापरल्याप्रकरणी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली परिसरात बनावट बंदुक परवान्याचा सर्रास वापर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंदुकाचे बनावट परवाने तपासण्यासाठी शोध मोहिम राबविण्याबाबत तसेच अटक केलेल्या आरोपीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली असून त्याचेविरुध्द मानपाडा पोलीस ठाणे येथे गुरनं. ४१/२०१७ भादंवि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ सह शस्त्र अधि. १९५९ चे कलम ३, २५ म.पो.का. कलम ३७ (१) १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वांद्रे (पूर्व) मुंबई येथील रेल्वे स्टेशनलगतच्या सर्व झोपडया व अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत**

**(३६) * २७९४६ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे (पूर्व) मुंबई येथील रेल्वे स्टेशनलगतच्या सर्व झोपडया व अनधिकृत बांधकामे त्वरित काढून टाकण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निर्णयानुसार वांद्रे (पूर्व) भागातील रेल्वे स्टेशनलगतच्या झोपडया व अनधिकृत बांधकाम उठविण्यासाठी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान नोटीस देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागातील अनधिकृत बांधकामे उठविण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अनधिकृत बांधकामे उठविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) वांद्रे (पूर्व) येथील रेल्वे स्टेशनलगतची जमीन ही पश्चिम रेल्वे प्रशासनाच्या मालकीची असून, तेथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याची जबाबदारी ही रेल्वे प्राधिकरणाची आहे.

तथापि, सदर ठिकाणच्या जलवाहिनीलगत असणाऱ्या एकूण १९२ झोपडीधारकांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३१४ अन्वये दिनांक ०३/०९/२०१५ रोजी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत जलवाहिनीलगतच्या झोपडीधारकांची पुनर्वसनासाठी पात्रता तपासण्यात येत आहे. पात्र झोपडीधारकांची यादी (परिशिष्ट-२) तयार झाल्यानंतर, त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल व तद्नंतर पात्र व अपात्र झोपडीधारकांच्या झोपडयांचे निष्कासन करण्यात येईल.

(३), (४) व (५) महानगरपालिका व रेल्वे प्रशासनामार्फत रेल्वेच्या अखत्यारीतील जागेवरील २७ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत व उर्वरित अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी रेल्वे प्रशासनास आवश्यक ते सहकार्य करण्यात येत आहे.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेतील टॅब गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत**

**(३७) * २७२६० श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील टॅब गैरव्यवहाराची सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहारास जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील टॅब खरेदी संदर्भातील काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

तथापि, सदर तक्रारींमध्ये तथ्य आढळून आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिका प्रशासनाने कोटयवधी रुपयांच्या थकबाकीकडे दुर्लक्ष केल्याबाबत**

**(३८) * २८३३१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाईन शॉप मालक व ज्वेलर्स यांच्याकडून सन २०१० ते २०१३ या काळात जकातकर आणि दंडापोटी सुमारे ६०० कोटी रुपये येणे थकित असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाकडून कोटयवधी रुपयांच्या थकबाकीकडे दुर्लक्ष झाल्याने ठाणे महानगरपालिकेचे अतोनात नुकसान झाले असून याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील वाईन शॉप मालक व ज्वेलर्स यांचेकडून रुपये १६०.७७२ कोटी इतकी रक्कम थकीत असल्याचे जनहित याचिका क्र. २३८/२०१४ अंतर्गत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या दिनांक ०७/१२/२०१६ च्या निर्देशांमुळे शासनास अवगत झाले आहे.

(२) आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत :-

- या प्रकरणी चौकशी करुन दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द आवश्यकतेनुसार प्रशासकीय व फौजदारी कारवाई चार आठवड्यात करावी.
- या प्रकरणी ज्वेलर्स व मद्यविक्रेते यांनी चुकविलेला जकात, त्यावरील दंड व सर्व अनुषांगिकबाबी तसेच इतर सर्व थकबाकी व्याजावरील रक्कमेच्या वसुलीबाबत व्यक्तीशः लक्ष घालुन तीन महिन्याच्या कालावधीत नियमानुसार वसुली करावी.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायलादेवी तलाव व वागळे इस्टेट परिसर स्वच्छ करण्याबाबत

**(३९) * ३०१६१ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायलादेवी तलाव व वागळे इस्टेट परिसरात ठाणे महानगरपालिकेने अनधिकृतरित्या बंद पडलेल्या गाड्या व भंगार फेकले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाव परिसरात असलेले बांधकाम अतिधोकादायक स्थितीत असून सदर बांधकाम केलेल्या परिसरात प्रतिदिन हजारो नागरिकांची वर्दळ असल्याने फेकून दिलेल्या भंगारामुळे प्रतिदिन दोन ते तीन नागरिक जखमी होत असून त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर परिसर स्वच्छ करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) रायलादेवी तलाव व वागळे इस्टेट परिसरात विनावापर असलेली भंगार १२ वाहने एका बाजुला लावून ठेवण्यात आलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, नागरीक जखमी होणे वा त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे नाही.

(३) व (४) ठाणे महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येतात:-

- स्वच्छ भारत अभियानांतर्गत तलाव परिसर स्वच्छ करण्यात आला आहे.
- तलावाचा पृष्ठभागाचा कचरा काढून साफसफाई करण्यात येत आहे.
- घनकचरा विभागाकडून वेळोवेळी तलावाच्या परिसराची सफाई करण्यात येत आहे.
- तलाव परिसरातील भंगार वाहनांची विल्हेवाट लावण्याचे काम प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खार (मुंबई) येथे विकासकाने गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४०) * २८१४६ श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खार (मुंबई) येथे जिमखान्याजवळील के.मोरदानी रिअल्टीने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या वाढीव चटई क्षेत्रफळाचा वापर २० मजली अलिशान टॉवर बांधण्यासाठी केल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विकासकाने प्रकल्पग्रस्तांसाठी १७ सदनिका, बालवाडी, कल्याण केंद्र इत्यादीचे चटई क्षेत्रफळ डयुप्लेक्स सदनिका उभारण्यासाठी वापरण्यात आल्याने यातील सदनिका विक्रीवर एसआरए प्राधिकरणाने बंदी आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू एसआरए प्रकल्पातील गैरप्रकार व अनियमितता तसेच विकासकास मदत करणारे प्राधिकरणाचे अभियंता एकंदरीत प्रकरणाची शासनाने उच्चस्तरावरून चौकशी केली आहे काय, त्याचे निष्कर्ष आहेत,

(४) असल्यास, निष्कर्षानुसार विकासकाने चटई क्षेत्रफळाचा गैरवापर व विक्री करून आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी विकासकासह सर्व दोषीविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३(१४) मधील तरतुदीनुसार सदर योजनेचे जोगेश्वरी पूर्व येथील योजनेशी एकत्रिकरण करण्यात आलेल्या योजनेतून खार येथे २० मजली इमारत बांधण्यात आली आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या ३३(१४) अंतर्गत नगरविकास विभागाच्या दिनांक ३१/१०/२००८ रोजीच्या आदेशातील तरतुदीनुसार प्राधिकरणाकडून विकासक के. मोरदानी यांच्या खार येथील ५ योजनांचे जोगेश्वरी (पूर्व) येथील योजनेसोबत एकत्रिकरण करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुसार विकासकास खार येथील १७ कायमस्वरुपी संक्रमण शिबीराचे ४१९.३६ चौ.मी. क्षेत्र जोगेश्वरी (पूर्व) येथे व तेवढेच जोगेश्वरी (पूर्व) येथील विक्री घटकाचे क्षेत्रफळ खार येथे स्थलांतरीत करण्यास अनुमती देण्यात

आली आहे. सदरहू परवानगीच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद शासन आदेशातील तरतुदीनुसार विकासकाकडून रुपये ३,०४,३५,८७३/- इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे. तथापि, विकासकाने जोगेश्वरी येथील मिळकतीवर कायमस्वरुपी संक्रमण शिबीरातील १७ सदनिका बांधून दिल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दिनांक ०२/०१/२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन विकासकाच्या विक्री घटकाच्या गाळ्यांची नोंदणी करण्यात येवू नये, असे दिनांक २३/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त नियंत्रक (मुद्रांक शुल्क) यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले असून विकासकाच्या विक्री घटकातील बांधकामास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक २४/०१/२०१७ रोजी स्थगिती दिली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई-विरार महानगरपालिकेची पाणीपुरवठा योजनेची**
**जलवाहिनी सतत फुटत असल्याबाबत**

**(४१) * २७०१८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेची पेयजल वाहिनी सतत फुटत असून माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जलवाहिनी फुटल्यामुळे ५ दिवस नळपाणी योजना बंद करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नालासोपारा, गालानगर परिसरात एकदिवस आड पाणी येत असून पाण्याचा दाब कमी असल्यामुळे पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असल्याने तेथील चाळीतील रहिवासी टँकरची मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नळ पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे जानेवारी मध्ये केवळ दिनांक १८/०१/२०१७ रोजी तांत्रिक बिघाडामुळे एक दिवस पाणीपुरवठा बंद होता.

परंतु, दिनांक १६, १७ व २२ डिसेंबर, २०१६ रोजी काही तांत्रिक बिघाडामुळे व दिनांक २६/१२/२०१६ रोजी राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ लगत सुर्या पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिनीस ट्रकने धडक दिल्यामुळे दिनांक २६/१२/२०१६ ते दिनांक २८/१२/२०१६ या कालावधीत पाणीपुरवठा बंद होता.

(२) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रास आवश्यक पाणी मागणी व पुरवठा यामध्ये ९३ द.ल.लि. तुट असल्याने वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात एक दिवसाआड पाणीपुरवठा होतो, ही वस्तुस्थिती आहे.

माहे जानेवारी, २०१७ मध्ये गालानगर नालासोपारा, परिसरातील रहिवाश्यांनी टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी केल्याचे वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या निदर्शनास आले नाही. परंतु, नालासोपारा परिसरात अशा प्रकारची मागणी उन्हाळ्यात करण्यात येते.

(३) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रास आवश्यक अधिक ९३ द.ल.लि. इतक्या पाण्याची उपलब्धतता करण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे योजना मंजुर केल्या आहेत.

- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत रुपये २६९ कोटींची १०० द.ल.लि. ची पाणीपुरवठा योजना अंतिम टप्प्यात असून मार्च, २०१७ अखेर पर्यंत उक्त पाणी उपलब्ध होणार आहे.
- अमृत योजनेंतर्गत पाणी वितरण व्यवस्था बळकटीकरण व सुधारणा करण्याकरीता रुपये १३५.५९ कोटी इतक्या रकमेची योजना मंजूर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या कार्यालयात सहाय्यक पदाच्या सेवा भरतीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४२) * ३०४४३ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या कार्यालयात सहाय्यक संवर्गात सन २०१३ मध्ये वा त्यादरम्यान अनुसूचित जाती या प्रवर्गाच्या रिक्त असलेल्या घटनादत्त आरक्षित पदांवर खुल्या प्रवर्गातून उमेदवारांची नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक पदाच्या सेवा भरतीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत शासन आणि प्राधिकरण यांच्याकडे तक्रारी व निवेदने दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार सर्व संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२) होय.
(३) व (४) महानगर आयुक्तांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार वेळोवेळी पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आलेली असल्यामुळे संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेला प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पुरेसा निधी देणेबाबत

**(४३) * २७३१८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेला शासनाने अडीच वर्षात केवळ १५ लाखाचा निधी दिल्याने निधी अभावी अनेक प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महानगरपालिकेला क्षेत्रातील प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पुरेसा निधी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

पुणे महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियानाद्वारे रुपये १००० कोटींचे प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत. तसेच अमृत अभियानांतर्गत पुणे शहराचा रुपये २०० कोटींचा मलनिस्सारण प्रकल्प प्रस्तावित आहे.

पुणे महापालिकेला मागील अडीच वर्षात विविध प्रकल्पांतर्गत रुपये ३८८.०३ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रलंबित प्रकल्पांसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळविण्यासाठी उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र शासनास सादर केली आहेत.

त्या आधारे मार्च, २०१७ मध्ये निधी वितरीत होणे अपेक्षित आहे.

केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होताच त्यासोबत राज्य हिश्श्याचा निधी मंजूर करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा पथकाने नव्या नोटा जप्त केल्याबाबत**

**(४४) * २९३०५ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर, नवी मुंबई, ठाणे येथे नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकाने सेक्टर १९ मधील एका फ्लॅटवर छापा टाकून सुमारे ४५ लाख रुपयांच्या नव्या नोटा जप्त केल्या असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय चलनातून बाद करण्यात आलेल्या ५०० व १००० रुपयाच्या नोटा कमिशनवर घेऊन त्याबदल्यात २ हजार रुपयांच्या नव्या नोटा बदलून देण्याचा व्यवहार काही व्यक्ती करत असून यामध्ये प्रामुख्याने लेबर कॉन्ट्रक्टर, रेती सप्लायर, दूध विक्रेता, डेकोरेटर इत्यादींचा समावेश आहे, तरी या पकडण्यात आलेल्या व्यक्तींवर शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणात दुधविक्रेता, लेबर कॉन्ट्रॅक्टर, रेती सप्लायर, बिल्डिंग मटेरियल सप्लायर, डेकोरेटर यांचा समावेश असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणात २ हजार रुपये दराच्या एकूण २२५० नोटा दोन पंचासमक्ष जप्त करुन आयकर अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिनांक ३१/१२/२०१६ रोजी देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे खारघर पोलीस ठाणे येथे दैनंदिनी नोंद क्र. ०४७/२०१६ दिनांक ३१/१२/२०१६ अन्वये नोंद घेण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कफ परेड पोलीस स्टेशनसमोरील रस्त्यावरील अतिक्रमणावर कारवाई करणेबाबत

**(४५) * २८६१८ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरमधील कफपरेड पोलीस स्टेशनसमोरील रस्त्यावर फेरीवाले, मासेविक्री व्यावसायिक इत्यादीचे अतिक्रमणामुळे परिसरामध्ये कचरा पसरला असून दुर्गंधीमुळे मलेरिया, डेंग्यू यासारख्या आजारांची नागरिकांना सतत लागण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी येथील नागरिक व लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री, आयुक्त, मुंबई महापालिका, जिल्हाधिकारी, मुंबई, उपजिल्हाधिकारी, मुंबई (अतिनिष्काषित व सक्षम प्राधिकारी, कुलाबा), सहा.आयुक्त (ए विभाग), मुंबई महानगरपालिका यांचेकडे दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी तसेच वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरची अतिक्रमणे निष्काषित करून येथील नागरिकांच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) कफ परेड पोलीस स्टेशनसमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरमधील रस्त्यावर फेरीवाले, मासेविक्री व्यावसायिक यांच्या अतिक्रमणामुळे परिसरामध्ये कचरा पसरल्याची दिनांक ०५/०१/२०१७ रोजीची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने, महानगरपालिकेने दिनांक ०७/०२/२०१७, ११/०२/२०१७ व दिनांक ०८/०३/२०१७ रोजी अतिक्रमण निर्मुलन निष्कासनाची कारवाई केली आहे.

तसेच, अनधिकृत मत्स्यविक्रेते, फेरीवाले यांच्यावर महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

सदर परिसरातील कचरा उचलण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत नियमितपणे करण्यात येते.

सदर परिसरात महानगरपालिकेने केलेल्या पाहणीमध्ये जानेवारी, २०१६ ते डिसेंबर, २०१६ अखेर मलेरियाचे ९ रुग्ण व मार्च, २०१७ पर्यंत २ रुग्ण आढळून आलेले आहेत.

तथापि, या कालावधीत डेंग्यु आजाराचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही.

हिवताप, डेंग्यु हे किटकजन्य आजार असून, सदर आजार पसरविणाऱ्या डासांची उत्पत्ती दुर्गंधीयुक्त पाण्यामध्ये होत नसून ती स्वच्छ साठलेल्या पाण्यामध्ये होते. त्यामुळे कचरा व दुर्गंधीमुळे हिवताप व डेंग्यु आजाराची लागण होते हे खरे नाही.

तथापि, किटकजन्य आजार पसरु नयेत यासाठी सदर परिसरात महानगरपालिकेमार्फत नियमितपणे अळीनाशकाची फवारणी व धुम्रफवारणी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अशासकीय आयटीआय संस्थांना अनुदान देण्याबाबत**

**(४६) * ३०२०२ श्री.विक्रम काळे, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्‌योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सन २००१ पूर्वी मान्यता दिलेल्या अशासकीय आयटीआय संस्थांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१), (२) व (३) राज्यातील सन २००१ पूर्वी मान्यता दिलेल्या अशासकीय आयटीआय संस्थांना अनुदान देण्याचा प्रस्ताव शासनाच्या तपासाधिन आहे.

-----------------

**वाघोली (ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती) येथील गजानन सूत गिरणीबाबत**

**(४७)** * **२९४६५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती) येथील गजानन सूत गिरणीत कार्यरत २०० कामगारांना मागील ४ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने येथील कामगारांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सूत गिरणीच्या आवारात मागील दिड वर्षापासून पेव्हिंग ब्लॉकचा कारखाना सुरु करण्यात आला असल्याने सूतगिरणीचे विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करुन या सुत गिरणीवर प्रशासक नियुक्त करावा अशी मागणी कामगारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सूत गिरणीवर प्रशासक नियुक्त करण्याबाबत व कामगारांचे थकीत वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) माहे जुलै, २०१६ पासून सूत गिरणी बंद असतानाही कामगारांचे वेतन दरमहा अदा करण्यात आले आहे. परंतु, आर्थिक अडचणींमुळे कामगारांचे माहे डिसेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१७ या दोन महिन्यांचे वेतन अदा करण्यात आले नव्हते. तथापि, दिनांक ८/०३/२०१७ रोजी गजानन सहकारी सूतगिरणी व कामगार संघ यांच्यामध्ये सहायक कामगार आयुक्त, अमरावती यांचे समक्ष समझोता होऊन कामगारांची वेतनाबाबतची मागणी पूर्ण झालेली आहे.

(२) सुतगिरणीच्या आवारात रिकामे असलेले गोडाऊन क्र.३ पेव्हींग ब्लॉकचा लघु उद्योग करण्यास श्री. अविनाश वडतकर यांना रुपये २०००/- प्रतिमाह प्रमाणे ५ वर्षाकरिता संचालक मंडळ सभा दिनांक ३०/४/२०१६ ठराव क्र.४ अन्वये भाड्याने दिली आहे. यासंदर्भात सुतगिरणीचे विद्यमान संचालक मंडळ बरखास्त करुन या सुतगिरणीवर प्रशासक नियुक्त करावा अशी मागणी कामगारांनी केली असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) सुतगिरणी व्यवस्थापन व कामगार संघटना यांच्यामध्ये सहायक कामगार आयुक्त, अमरावती यांच्या मध्यस्थीने समझोता घडून आल्याने कामगार संघटनेने दाखल केलेली तक्रार मागे घेण्यात आली आहे. तसेच, क्षेत्रिय कामगार अधिकारी यांनी सुत गिरणीवर वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंतर्गत निरीक्षण शेरे पारीत केले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शीव-पनवेल महामार्गावरील खारघर टोल वसूलीच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४८) * ३०२७५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शीव-पनवेल महामार्गावरील खारघर टोल वसूलीच्या निविदा प्रक्रियेच्या कामात नियमांना डावलून गैरव्यवहार झाल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाल्यानंतर माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मा.मुख्यमंत्र्याकडे प्रस्ताव पाठवून चौकशीची परवानगी मागितली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावानंतर पुन्हा एकदा एसीबीने स्मरणपत्र पाठवून परवानगी मिळावी म्हणून मागणी केलेली असतानाही आजमितीस शासनाची परवानगी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, परवानगी मिळण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), व (३) सायन-पनवेल महामार्गावरील टोल बुथवरील कामामध्ये व ठेका देण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सकृतदर्शनी अनियमितता झाल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या उघड चौकशीच्या प्रस्तावास शासनाने दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ रोजी उघड चौकशीस मान्यता दिलेली आहे.

-----------------

## नाशिक शहरातील रस्त्यांवरील बेवारस वाहने जप्त करुन वाहन मालकांवर कारवाई करण्याबाबत

**(४९) * ३००१० आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक (जि.नाशिक) शहरातील रस्त्यांवर अनेक बेवारस वाहने वर्षानुवर्षे वापराविना पडून असल्यामुळे वाहतुकीस अडचणी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नाशिक शहरातील रस्त्यावरील बेवारस वाहनांच्या मालकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करून अशी वाहने जप्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाशिक शहरात गॅरेजेस व भंगार व्यावसायिक यांचा व्यवसाय मोठया प्रमाणात असून सदर व्यावसायिक त्यांचेकडील भंगार वाहने रस्त्याचे कडेला जास्त काळ लावत असल्याचे व त्यामुळे वाहतूकीची समस्या निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) गॅरेजेस व भंगार व्यावसायिक हे वाहतूकीची समस्या निर्माण होईल अशा पध्दतीने वाहने रस्त्यावर लावत असल्याने त्यांना सीआरपीसी १४९ प्रमाणे नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. याबाबत संबंधितांची बैठक घेण्यात आली असून सदरचे वाहने तात्काळ हटविण्याबाबत त्यांना सूचित करण्यांत आलेले आहे. तसेच त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याची तयारी ठेवण्यांत आलेली आहे. नाशिक शहरातील बेवारस आढळून आलेल्या वाहनांसंबंधीची संबंधीत पोलीस ठाण्यात नोंद घेण्यांत येते. सदर वाहनाचे मालक मिळून आल्यास सदरचे वाहन हे मा.न्यायालयाच्या आदेशाने वाहनधारकास परत देण्यात येते. सन २०१५ मध्ये ३८ तर सन २०१६ मध्ये ५५ वाहनांवर संबंधीत पोलीस ठाणे / शहर वाहतूक शाखेकडून अनधिकृतरित्या पार्किंग केल्यावरुन कारवाई करण्यात आलेली आहे. नाशिक शहर वाहतूक विभागाकडून अनधिकृत पार्किंग केलेल्या वाहनांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| | **सन २०१५** | **सन २०१६** | **सन २०१७ (जानेवारी)** |
|---|---|---|---|
| केसेस | १२,२३१ | ३९,१७८ | २,७२६ |
| दंड | १२,२३,१०० | ४२,१६,५०० | ५,४५,२०० |

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई उपनगरातील मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पुनर्वसनाचे गृहनिर्माण धोरणाबाबत**

**(५०) * २७९५० ॲड.अनिल परब, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पुनर्वसनाचे गृहनिर्माण धोरण शासनाने जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गृहनिर्माण धोरणाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदर गृहनिर्माण धोरणात अनेक जाचक अटी व अतिरिक्त विकास शुल्क अधिभार लादण्यात आल्यामुळे इमारतीच्या पुनर्विकासाच्या प्रकल्पात अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर धोरणातील जाचक अटी व अतिरिक्त विकास शुल्क अधिभारासंदर्भात शासनाने फेरविचार केला वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी मा. मंत्री (गृहनिर्माण) यांनी गृहनिर्माण धोरण जाहीर केलेले आहे.

(२) दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी घोषित करण्यात आलेल्या गृहनिर्माण धोरणामध्ये मुंबई उपनगरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या भाडेतत्वावरील इमारतींमधील भाडेकरुच्या पुनर्वसनाकरीता सदर इमारतींच्या पुनर्विकासामध्ये प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र अनुज्ञेय करण्याची बाब अंतर्भूत आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९६६ च्या कलम ३७ (१कक) अन्वये शासनाने प्रसिध्द केलेल्या प्रारुप विनियमामध्ये विकास कराबाबतची तरतूद आहे. सदर विनियम हे प्रारुप विनियम असून या विनियमावर शासनाकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेवून शासनाकडून विनियमांना अंतिम मंजूरी संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---------------

## कळवा (जि.ठाणे) खाडीलगत असलेल्या अनधिकृत झोपडपट्ट्यांवर महापालिकेने कारवाई केल्याबाबत

**(५१) * २८३३२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) खाडीलगत असलेल्या झोपडपट्टयामध्ये वर्षानुवर्षे लोक वास्तव्य करीत असुन या अनधिकृत झोपडया हटविण्याबाबत महापालिकेने कारवाई सुरु केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारणास्तव या झोपडपट्टयामध्ये वास्तव्य करणारे नागरिक रस्त्यावर आले असुन त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे महानगरपालिका व जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यामार्फत संयुक्तपणे खाडीमध्ये भराव टाकून उभारलेल्या झोपड्या हटविण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली होती. तथापि, सदरची कार्यवाही स्थगित आहे.

(२) कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने पुनर्वसनाचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) शहरातील विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(५२) * २८६१९ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) शहरातील सि.स.नं. ३८०७/३८०८ आणि ३९०७/३९०८ मधील १६६ विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी येवला नगरपरिषदेने पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधीनी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनामार्फत सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निष्कासित केलेल्या अतिक्रमण धारकांना, दुकान गाळे वितरणाबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१५ अन्वये सादर केला होता.
(२) होय.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध गाळयांचे प्रचलित पध्दतीनुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समिती मार्फत लिलावाने वितरण करण्याबाबत दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या शासनपत्रान्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांना कळविले आहे.

-----------------

**नागपूर शहरातील सायको-किलरला पकडणेबाबत**

**(५३) * ३०२३३ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात सायको किलरची दहशत निर्माण झाली असून सदर माथेफिरु महिला व मुलींवर मागून चाकू हल्ला करीत असून माहे जानेवारी-फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत ६ महिलांवर चाकू हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार सदर सायको-किलरला पकडणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहरात माहे जानेवारी, २०१७ मध्ये अनोळखी व्यक्तीकडून महिला व मुलींवर चाकू हल्ला केल्याबाबत एकूण ६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) सदर प्रकरणी दाखल सहा गुन्हयात अनोळखी आरोपी असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्हयामध्ये आरोपीना अटक करण्यासाठी नागपूर पोलिसांनी खालीलप्रमाणे उपाययोजना केली आहे.

अ) पोलीस ठाणे अजनी, सक्करदरा, हुडकेश्वर हद्दीत मुख्य रोड, गल्ली बोडीत तसेच निर्जन रस्ते, बगीचे अशा ठिकाणी स्थानिक पोलीस आणि गुन्हे शाखेतील सर्व पथकातील अधिकारी व कर्मचारी साध्या पोषाखात तैनात करण्यात आले आहे.

ब) त्या भागातील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासण्यात आले आहे.

क) पोलीस ठाणे पेट्रोलींग मोबाईल, बिट मार्शल यांच्या पेट्रोलींग मध्ये वाढ करण्यात आली आहे. तसेच पोलीस मित्रांची मदत घेण्यात आली आहे.

ड) शहरातील कोणीही न घाबरता आपले दैनंदिन कामकाज, शिक्षण नियमित सुरू ठेवण्याकरीता नागपूर पोलीस ठिकठिकाणी पेट्रोलींगवर असून काही माहिती मिळाल्यास तात्काळ स्थानिक पोलीस किंवा पोलीस नियंत्रण कक्षात सुचना देण्याबाबत स्थानिक वृत्तपत्राद्वारे तसेच नागरिक सभेमार्फत नागरिकांना माहिती देवून जनजागृती करण्यात आली आहे. तसेच परिसरातील प्रत्येक हालचालीवर वरिष्ठ पातळीवर तसेच पोलीस नियंत्रण कक्षामार्फत सतत लक्ष ठेवण्यात येत आहे.

इ) पोलीस स्टेशनमधील पेट्रोलींग व्हॅन, सीआर मोबाईल, चार्ली, पोलीस स्टेशनचे डी.बी. पथक, गुन्हे शाखा, विशेष परिमंडळ पथक यांची सतत पेट्रोलींग करून संशयितांना चेक करण्यात आले आहे. नाकाबंदी मध्ये वाढ करण्यात आली आहे. अभिलेखावरील गुन्हेगार तपासण्यात आले आहे तसेच आरोपीचे स्केच तयार करून शोध मोहीम सुरू आहे.

सदर प्रकरणी दाखल सहाही गुन्हयाचा बारकाईने तपास करण्यात येत असून आरोपीस अटक करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.